॥ खंड ०९ ॥
॥ भजन पाठा नं. १३ ॥

॥ शुर विर खेत्री भजनं पाठे चा संग्रह ॥

॥ शुर विर खेत्री भजन पाठा १३/०१ ॥

॥ शुर विरा बांध कंबर । निघ बाहेर..
तुला पाहता, तिरभवन कापे थरथर ॥
॥ शुर विरा बांध कंबर । निघ बाहेर..
त्वा पाय टाकता, तिरभवन कापे थरथर ॥
॥ शुर विरा बांध कंबर । निघ बाहेर..
तु पाउल टाकुन । यवगाची मोहीम कर ॥
॥ खेत्री ढाल पटाईत । या यवगाचे कारण याहीच्या हात ॥
॥ खेत्री ढाल पटाईत । याहो महाराजा दया बाळला भेट ॥
॥ खेत्री शुर विर भगवान । गोपाळा/लेकरां साठी ये बाप्पा धावुन ।
॥ खेत्री शुर विर भगवान । गोपाळला/अन्जानांला ने बाप्पा तारून ।
॥ खेत्री शुरविर भगवान । खेत्री आला बाळचा धावुन ॥
॥ खेत्री बाहेर निघाला । रमणा यवगाचा हाती धरला ॥
॥ खेत्री बाहेर निघाला । भारी संभाळ या देवानं केला ॥

॥ भाल्याचा भजन पाठा १३/०२ ॥

॥ भाला शुरा विरांचा । संहार करते हा देव रोगा विघ्नाचा ॥
॥ भाला शुरा विरांचा । संहार करते हा देव व्दैत दुर्जनाचा ॥
॥ भाल्या वरत भाले रंचले । खेत्रीयाची शाळा ।
खेत्रीयांची शाळा, त्यामध्ये खेळे कृष्ण राया ॥
॥ सुटला अगन्या बाण । देहीचे रोग-विघ्न हे जातीन जळुन/उडुन.

॥ द्युतांचा भजन पाठा १३/०३ ॥

॥ दरबार द्युतांचा/सावाचा होय । ख-या खोटयाचा ईथ न्याय आहे.
॥ ईंद्रानं केला परं । कृष्णा वरं ।
यान गोवर्धन धरले/तारले । नखा वरं ॥
॥ गोवर्धन नखी धरला । यानं ईंद्रांचा पण हो, खाल्या केला ॥
॥ हिरण्यकश्य नखीं फाडला । आपला बाळ देवानं ओटयात घेतला ॥
॥ रामानं सिता कशी मुकलीसे वनाशी ।
तशीच गत, नको करू कृष्णा । आपल्या भक्त जनाची ॥
॥ सिता जाणकी उचल पालखी । माय रुक्माई ।
सावंगपुर नगर माझं । माहेर होय बाई ॥
॥ तारा बाईचा स्वर्गि घंटा वाजे । ३३ कोटी देव थरथरा कापे ॥
॥ तारा बाईचा विर हनुमान । आला यवगाचा खेळ ।
आला यवगाचा खेळ । कृष्णा, निघ बाहेर । दावा सेरूप ॥
॥ महाविर मारोती झाला । विघ्नं निवारी ।
श्री कृष्ण नामाची टाळी । भक्ताला तारी/तारती ॥
॥ हनुमान हरीश्चंद्र आहे । या गण नामी ।
या गण नामी, विघ्ने उडवाच्या कामी ॥
॥ मोडन जंतराचे भार । उभा आहे पुर्ण अवतार ॥

॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥